F:\Pigulkar\Opening New College\List Opening 2012-13\Opening 2012-13/Circular

# मुंबई विद्यापीठ

क./संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/ 25

## परिपत्रक:

सर्व संलग्नित / मान्यताप्राप्त / अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य/ संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी पत्र क. शासन परिपत्रक क. संकीर्ण.१११११/(१८७/१६)/तांशि-२, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ रोजी कळविले आहे की, राज्यातील उर्जेची बचत व पर्यावरणाचे संवर्धन ही अतंत्य महत्वाची बाब असल्याने महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रकल्प अहवाल, जर्नल्स इत्यादी करिता कागदाच्या दोन्ही बाजूला म्हणजेच पाठपोट प्रिंट करण्यासाठी न चुकता वापर केल्यास मोठया प्रमाणात पर्यावरणाचा -हास टाळता येऊ शकेल तसेच उर्जेची व पाण्याची बचत करणे शक्य होईल.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कागद वापरण्याच्या काटकसरीने पाणी व उर्जा वाचविण्याकरिता तसेच पर्यावरणाच्या -हास टाळण्याकरिता विद्यार्थ्यांना जर्नल्स व विविध प्रकारचे प्रकल्प कागदाच्या दोन्ही बाजूस म्हणजेच पाठपोट प्रिंट काढण्याच्या सुचना देण्यात याव्या.

21/1/17

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

मुंबई-४०० ०३२.
19th जानेवारी,२०१७

प्रति
सर्व संलग्नित / मान्यताप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य/ संस्थाचे संचालक.